आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१३ एप्रिल २०२६ - सोमवार

**ठळक बातम्या**

- यंदा मान्सूनचा पाऊस सरासरीपेक्षा कमी पडण्याची शक्यता

- नारी शक्ती वंदन अधिनियमातल्या सुधारणा हा या शतकातला सर्वात मोठा निर्णय असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन, महिला आरक्षण प्रस्तावाच्या चर्चेची वेळ आणि मतदारसंघ पुनर्रचना प्रस्तावाला काँग्रेसचा आक्षेप

- MPSCच्या माध्यमातून आणखी १०० संवर्गातल्या पदांची भर्ती करण्याचा राज्य सरकारचा निर्णय

- ठाणे जिल्ह्यात मुरबाडजवळ झालेल्या रस्ते अपघातात ११ जणांचा मृत्यू

**आणि**

- ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या पार्थिवावर मुंबईत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**<><><><><>**

यावर्षी जून ते सप्टेंबर या कालावधीत होणारा मान्सूनचा पाऊस सरासरीपेक्षा कमी पडण्याची शक्यता आहे, असं हवामान विभागाचे महासंचालक मृत्युंजय मोहापात्रा यांनी सांगितलं. ते आज नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांना याबाबत माहिती देत होते. देशभरात हंगामी पावसाचं प्रमाण दीर्घकालीन सरासरीच्या ९२ टक्के राहण्याची शक्यता आहे, असंही त्यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट**

**<><><><><>**

नारी शक्ती वंदन अधिनियमात सुधारणा करुन २१ व्या शतकातला सर्वात मोठा निर्णय भारत घेणार आहे. त्यासाठी सर्वांनी पाठिंबा द्यावा असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्लीत आयोजित नारी शक्ती वंदन

संमेलनात ते बोलत होते. महिलांच्या सहभागाने देशातली लोकशाही बळकट होत असल्यानं या आरक्षणाची गरज आहे. राष्ट्रपतींपासून प्रधानमंत्री पद भूषवताना या देशात महिलांनी स्वतःची अमीट छाप उमटवली असल्याचंही ते म्हणाले. १६ ते १८ एप्रिलच्या दरम्यान संसदेत नारी शक्ती वंदन अधिनियमातल्या सुधारणांवर चर्चा होणार आहे, असं ते म्हणाले. २०२३ मध्ये या अधिनियमाला मंजुरी दिली तेव्हा सर्वच राजकीय पक्षांनी याला पाठिंबा दिला होता याची आठवण त्यांनी यावेळी केली.

**- - होल्ड प्रधानमंत्री बाइट - - -**

२०२९ च्या निवडणुकांपासून या निर्णयाची अंमलबजावणी करावी अशी मागणी विरोधी पक्षांसह सर्वांनी केली होती, त्या दिशेनं सरकारनं प्रयत्न सुरू केले होते आणि विविध घटनातज्ज्ञांशीही चर्चा सुरू होती, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

लोकसभा आणि विधानसभेत महिला आरक्षणापेक्षाही मतदारसंघांची फेररचना हा अधिक गंभीर मुद्दा असल्याचं काँग्रेस संसदीय पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी यांनी म्हटलं आहे. फेररचनाविषयक प्रस्ताव अत्यंत धोकादायक आणि संविधानातल्या तरतुदींचं हनन करणारा असल्याची टीका त्यांनी वृत्तपत्रात लेख लिहून केली आहे. लोकसभा आणि विधानसभांमधे महिलांसाठी ३३ टक्के जागा राखीव ठेवण्यासाठीचं विधेयक नारी शक्ती वंदन अधिनियम, २०२३ मधेच मंजूर झालं. २०२४ च्या निवडणुकांपासूनच या सुधारणा लागू करण्याची मागणी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केली होती. पण सरकारनं ती फेटाळून लावली याची आठवण त्यांनी यावेळी करुन दिली. आगामी जनगणना आणि जनगणनेवर आधारित मतदारसंघ फेररचना झाल्यावरच नवीन सुधारणा लागू झाल्या पाहिजेत अशी विरोधकांची मागणी असल्याचं गांधी यांनी नमूद केलं.

जातनिहाय जनगणना करण्यासाठी टाळाटाळ करायची हाच केंद्र सरकारचा खरा हेतू असल्याचा आरोप सोनिया गांधी यांनी केला आहे. पश्चिम बंगाल आणि तमिळनाडूमधे विधानसभा निवडणुका ऐन भरात असताना महिला आरक्षण विधेयकावरुन विरोधकांवर दबाव आणण्याचा हा प्रयत्न असल्याचं त्यांनी या लेखात लिहिलं आहे.

**<><><><><>**

राज्य सरकारमधल्या पदभरती प्रक्रियेत सुधारणा करायचा निर्णय राज्य मंत्रीमंडळानं आज घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत ही बैठक झाली. अराजपत्रित पदांसाठी कुठलीही मुलाखत यापुढं होणार नाही. तसंच पदभरतीमधल्या सुधारणेमुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून घेण्यात येणाऱ्या विविध सेवांतर्गत संवर्गांची संख्या १०२ होणार आहे. तर संयुक्त परीक्षा योजनेमध्ये नव्यानं १८ सेवांचा आणि ९३ संवर्गाचा समावेश होईल. यामुळे विविध सेवाप्रवेश नियमांचं तसंच अनुभवांच्या अटींचं सुसूत्रीकरण होणार आहे. यापुढं सर्वसाधारणपणे सरळसेवा भरतीसाठी अनुभवाची अट लागू राहणार नाही.

MPSC कडून अंतिम निवडीसाठी शिफारस न झालेल्या उमेदवारांची माहिती विविध कंपन्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी महाजॉब्स पोर्टलअंतर्गत “निपुण सेतू” हा उपक्रम सुरू केला जाणार आहे.

**<><><><><>**

इराणमधे उत्पादित झालेल्या कच्च्या तेलाचे टँकर्स भारतातल्या बंदरांवर आले आहेत. शिप ट्रॅकिंग डेटामधून आज ही माहिती समोर आली आहे. तब्बल ७ वर्षांनंतर इराणचं कच्चं तेल भारतात आलं आहे. सुमारे २० लाख बॅरल क्रूड ऑईल घेऊन फेलिसिटी जहाज गुजरातच्या सिक्का बंदरावर, तर जया हे जहाज ओदिशातल्या पारादीप बंदरावर पोहोचलं आहे. इराणकडून तेल खरेदी केल्याबद्दल

अमेरिकेनं लावलेल्या वाढीव आयातशुल्कात सूट मिळाल्याच्या कालावधीत ही जहाजं इराणच्या खरग बेटावरुन निघाली होती.

**<><><><><>**

ठाणे जिल्ह्यात कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर मुरबाडजवळ आज सकाळी सिमेंट मिक्सर आणि खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनाची टक्कर होऊन झालेल्या अपघातात ११ प्रवाशांचा मृत्यू झाला, तर १ जण गंभीर जखमी झाला. हे वाहन मुरबाडहून कल्याणला जात होतं.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमधे मतदार याद्यांच्या सखोल पुनरिक्षणादरम्यान अनेक नावं वगळली गेल्याबाबत दाद मागणारी याचिका आज सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली. पुनरिक्षण मोहिमेसाठी स्थापन केलेल्या विशेष न्यायधिकरणांकडे याचिकाकर्त्यांनी आपली गाऱ्हाणी मांडावी, असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांनी सांगितलं. मतदानाचा अधिकार संवैधानिक आणि लोकशाहीत सहभागाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे, तथापि मोठ्या प्रमाणात नावं वगळली गेल्याने निवडणूक प्रक्रीयेवर परिणाम होत नसेल तर त्या सुधारणेकरता निवडणूक प्रक्रीया थांबवता येणार नाही, असं निरीक्षण न्यायालयाने नोंदवलं.

**<><><><><>**

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या पार्थिवावर शोकाकूल वातावरणात संध्याकाळी मुंबईतल्या शिवाजी पार्क इथल्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार झाले. त्यापूर्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यातर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आशा भोसले यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण केलं. चित्रपट, सामाजिक आणि इतर क्षेत्रातले मान्यवर उपस्थित होते. अंत्यसंस्काराच्या वेळी हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीतल्या गायकांनी आशा भोसले यांची गाणी गाऊन साश्रू नयनांनी आशा

भोसले यांना निरोप दिला. सकाळपासून आशा भोसले यांच्या घरी त्यांच्या पार्थिवाचं अंत्यदर्शन घेण्यासाठी मोठी रीघ लागली होती. त्यात विविध क्षेत्रातले मान्यवर आणि सर्वसामान्य नागरिकांचा समावेश होता.

**<><><><><>**

भाजपाचे जेष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज 'मेरा बूथ - सबसे मजबूत' या उपक्रमात तामिळनाडूमधल्या पक्ष कार्यकर्त्यांशी संवाद साधला. तामिळनाडूमध्ये नवीन वातावरण तयार होत असून राज्यातली जनता बदलासाठी भाजपा आणि रालोआकडे अपेक्षेनं पाहत आहे, असंही ते म्हणाले. शेतकरी कल्याणाला आपला पक्ष सर्वोच्च प्राधान्य देत असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं. मध्यम वर्गाची स्वप्न साकारण्यासाठी सरकारनं अनेक पावलं उचलली आहेत, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भाजपा नेते, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पश्चिम बंगालला घुसखोरीमुक्त करणार असल्याचं प्रतिपादन केलं. ते आज पश्चिम बर्धमान जिल्ह्यातल्या राणीजंग इथं झालेल्या प्रचार सभेत बोलत होते. यापूर्वी तृणमूल काँग्रेसनं घुसखोरी रोखण्यासाठी तारेचं कुंपण उभारण्याकरता जमीन उपलब्ध करून दिली नसल्याची टीका त्यांनी केली. तर दुसरीकडे मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पश्चिम बंगालच्या एसआयआरमधून नावं वगळल्याबद्दल भाजपावर टीका केली. त्या पश्चिम बर्धमानच्या रघुनाथपूर आणि बांकुरा जिल्ह्यातल्या सभेत सहभागी झाल्या होत्या.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज हैद्राबादच्या राजीव गांधी स्टेडीयमवर सनरायझर्स हैद्राबाद आणि राजस्थान रॉयल्स यांचा सामना सुरु आहे. राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. शेवटची

बातमी हाती आली तेव्हा सनरायझर्स हैद्राबादच्या ९ षटकात २ बाद ७३ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//